CMYK

दे धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २६ मार्च २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १७६ वा किंमत : ५ रुपये पाने १२

**आजचा सामना**

CHENNAI SUPER KINGS Vs GUJARAT TITANS

चेन्नई सुपरकिंग्ज वि.गुजरात टायटन्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : चेन्नई



## माढ्यात पवारांचा

# ‘टांगा पलटी, घोडा फरार!’

## ‘चान्स’समोर पण

# अकलूजचे बंड झाले गार!!



✔ शिवाजी भोसले/सोलापूर

**बारामती मतदार संघातील गणिताची जुळवाजुळव करण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माढा लोकसभा मतदारसंघात ‘अनुकूल’ उमेदवार निश्चित केला पण ऐन लढाईच्यावेळी त्यांचा हा भरवशाचा टांगा पलटी होऊन घोडा फरार झाला! आता हा घोडा बारामतीत शिरतोय की मराठवाड्याच्या टोकाला जाऊन स्थिरावतोय, हे लवकरच स्पष्ट होईल.**



माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अधिकृत उमेदवार राष्ट्रीय पक्षाचे महादेव जानकर यांनी अचानक महायुती सोबत घरोबा केला, त्यामुळे आता माढ्यात महायुतीचे उमेदवार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांच्या विरोधात राष्ट्रवादीचा उमेदवार कोण? हा प्रश्न निर्माण झाला. भारतीय जनता पक्षाने उमेदवारीत डावललेल्या अकलूज येथील बलाढ्या मोहिते-पाटील परिवाराने धैर्यशील मोहिते-पाटील यांचे नेतृत्व पुढे करत बंड पुकारले होते. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून माढ्याची निवडणूक लढवावी, अधी मोहिते-पाटील समर्थकांची ‘जबरी’ इच्छा होती. मात्र शरद पवारांनी माढ्याची जागा रासपला सोडण्याचा निर्णय घेतल्याने मोहिते-पाटील परिवाराची कोंडी झाली होती. आता पवारांचा भरवशाचा उमेदवारच पळून गेल्याने मोहिते-पाटील समर्थकांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. परंतु ‘शिवरत्न’ वरील सामसूम वेगळेच संकेत देत आहे. मोहिते-पाटील परिवाराचे गावभेट दौरेही अचानक थांबल्याने त्यांचे हे बंड थंड झाले काय? याची चर्चा आता संपूर्ण जिल्ह्यात सुरु झाली आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासोबत बोलणी झाली. शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या कोट्यातील माढ्याची जागा देण्याचं ठरलं. बोलाचाली झाली. लढण्याची घोषणाही झाली. यावर अवघं ४८ होतात ना होताय तो पर्यंत सगळंचं कसं वेगळं झालं.३६० अंशात भूमिकाही बदलली. राजकारणात काही खरं नसतं बरं का याचा प्रत्ययही आला.वाचको, आपण ओळखलंच असेल.हे वर्णन कोणाच्या बाबतीत लागू होतंय. होय! तेच ते नाव राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय नेते महादेव जानकर. अगदी खरं आहे. महादेव जानकर यांच्याबाबतीतच हे सगळं नाट्य घडलं आहे अन् अगदी तेही अवघ्या ४८ तासांत बरं का. राजकीय नाट्यमय घडामोडीतून महादेव जानकर हे थेट महाविकास आघाडीतून महायुतीच्या वळचणीला गेले. यावरून सगळ्यांचेच डोळे विस्फारले.

विशेषत्वे, महादेव जानकर यांच्या कोलांड उडीने माढा आणि बारामती मतदार संघामधील चित्र पालटले. माढा मतदार संघात शरद पवार गटाला पुन्हा नव्याने उमेदवारीची अटकळ बांधण्याची वेळ आली तर महादेव जानकर यांच्या महायुतीच्या वळचणीला जाण्यानं नाही म्हटलं तरी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं टेन्शन वाढलं. महादेव जानकर यांना महायुतीत घेताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टाकलेला डाव शरद पवार यांच्यासाठी अडचणीचा आणि ऐनवेळी डोकेदुखीचा ठरला. सगळं काही झालं ते महादेव जानकर यांच्या बदलेल्या भूमिकेनं.

महायुतीच्या त्यातही भाजपाच्या वळचणीला असलेल्या महादेव जानकर यांनी भाजपावर आक्षेप लावत शरद पवार यांच्या वळचणीला जाणे पसंद केले. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे यांच्या विजयासाठी जानकर यांचा वापर करून घ्यायचा या हेतूने, ‌ङ्गकोण जानकर मी ओळखत नाहीफ असं सुरवातील म्हणत त्यांची किंमत कमी करणाऱ्या शरद पवारांनी जानकर यांना जवळ केलं.

### शरद पवारांची रणनीती फेल



खासदार सुप्रिया सुळे यांना कोणत्याही परिस्थितीत बारामती मतदार संघातून निवडून आणण्याचं आव्हान शरद पवार यांच्यापुढं आहे. त्यासाठी वाटेल त्या राजकीय तडजोडी करण्याच्या मनस्थितीत पवार आहेत. माढ्यात महादेव जानकर यांना संधी देऊन बारामतीमधील धनगर समाजाची व्होट बँक खासदार सुप्रिया सुळे यांच्या पाठीशी लावण्याची रणनीती शरद पवार यांनी आखली होती. हा निर्णय निश्चित झाला होता. पण शरद पवारांची ही रणनीती महायुतीच्या नेतेमंडळींनी फेल ठरविली. महादेव जानकर यांचा यू टर्न घ्यायला लावत परभणी लोकसभेचा मार्ग त्यांच्यासाठी सुकर केला.

आपल्या राष्ट्रवादी गटाच्या कोट्यातील माढ्याची जागा जानकर यांना लढण्यासाठी दिली. लोकसभेची जागा दिल्यानं जानकरदेखील खूष झाले. तथापि, जानकर हे शरद पवार यांच्या गटाला जाऊन मिळाल्याचे लक्षात येताच, महायुतीमध्ये खळबळ माजली. जानकर हे महाविकास आघाडीत जाणे महायुतीला परवडणारे नाही, असे सांगत महायुतीवाल्यांनी जानकर मोहरा शरद पवार गटाकडून आपल्याकडे वळविण्याचा घाट घातला. हालचाली वेगवान घडवून आणत अवघ्या ४८ तासांत जानकर यांना महायुतीच्या वळचणीला पुन्हा आणले. महायुतीच्या कोट्यातील परभणीचा जागा जानकर यांच्या रासपला सोडण्याचा निर्णय झाला.

# मोहिते-पाटलांना स्पेस


**महादेव जानकर यांना महायुतीनं आपल्या वर्तुळात घेऊन परभणीची जागा महायुतीच्या कोट्यातून राष्ट्रीय समाज पक्षाला देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळं कोंडी झालेल्या मोहिते-पाटील गटाला शरद पवार गटात स्पेस निर्माण झाली आहे. तडजोड यशस्वी झाल्यास धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासाठी माढा लोकसभा लढण्यासाठी शरद पवार राष्ट्रवादी गटाचं तुतारी हे चिन्ह घेता येऊ शकतं.**




उल्लेखनीय बाब म्हणजे शरद पवार गटाकडं माढा लोकसभा मतदार संघातून भाजपाचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळर यांना टक्कर देणारा मोहिते-पाटील यांच्याशिवाय सक्षम चेहरा सध्या तरी दिसत नाही. महादेव जानकर यांचं महायुतीमध्ये जाणं हे मोहिते-पाटील यांच्यासाठी पथ्यावर पडलं आहे. शरद पवार राष्ट्रवादी गटात प्रवेश करून लढण्याचा मार्ग मोहिते-पाटील यांचा मोकळा झाला आहे, पण मोहिते-पाटील हा निर्णय घेतात का? हे पाहणे महत्वाचे आहे. तसं पाहिलं तर शरद पवार राष्ट्रवादी गटात प्रवेश करून त्यांच्या तुतारी या चिन्हावरच लढावं असा मोठा आग्रह मोहिते-पाटील यांच्या समर्थकांचा आहे.

अचानक थांबविलेले माढा लोकसभेच्या मतदार संघामधील दौरे, भाजपामध्येच थांबायचे की बंडखोरीचं निशाण फडकावत माढ्याच्या महासंग्रमात लढायचं, या संदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याकडून मिळत नसलेला निरोप, ‘शिवरत्न’ बंगल्यावर झालेल्या मोहिते-पाटील कुटुंबियांच्या बैठकीची गुलदस्त्यात राहिलेली माहिती, भाजपाकडून मनधारणीसाठी कोणतेच न झालेले प्रयत्न या सगळ्या पार्श्वभूमीवर, सध्या अकलूज मोहिते-पाटील समर्थकांमध्ये संभ्रमाचे ढग निर्माण होतानाच, मोहिते-पाटील माढ्याची उमदेवारी लढण्यावरून टोकाचा संघर्ष करणार नाहीत, हे सध्या तरी एकूणच त्यांच्या गोटातील हालचालीवरून दिसत असून मोहिते-पाटलांचं संभाव्य बंड फसलं का? अशी चर्चा सुरू होऊ शकते.

# फक्त संभ्रम अन् संभ्रमच



**मंगळवारच्या दौऱ्याची प्रतीक्षा :** जनमताचा कौल घेण्यासाठी माढा मतदार संघातील गावांमध्ये दौऱ्यांचा झंझावात काढलेले मोहिते-पाटील कुंटुंबीय आणि त्यांचे खास समर्थक दोन दिवसांपासून शांत आहे. शिवरत्न बंगाल्यावर गाड्या लागलेल्या दिसत आहेत. रणजितसिंह मोहिते-पाटील हे मुंबईत असल्याचे सांगण्यात आले. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह सगळे कुंटुंबीय घरीच आहेत. मंगळवारी मोहिते-पाटील कुंटुंबीयांचा दौरा कोठे आहे? याचा तपशील सोमवारी रात्री उशीरापर्यंत आलेला नव्हता.

माढ्यात भाजपाची उमेदवारी मोहिते-पाटील परिवारात धैर्यशील मोहिते-पाटील यांना देण्याची आग्रही मागणी होती. तथापि, विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना पुन्हा उमेदवारी देऊन भाजपाने मोहिते-पाटील यांना झिडकारले. त्याचा राग धरून मोहिते-पाटील यांनी निवडणूक लढवायचीच हा इरादा पक्का केला. जनमताचा कौल घेऊन मोहिते-पाटीलांनी दौरे केले. गिरीश महाजन यांच्यासमोर मोठे शक्तिप्रदर्शन करीत मोहिते-पाटील गटाची ताकद दाखविण्याचा घाट घातला. याशिवाय मोहिते-पाटील प्रेमी राजराजे निंबाळकर यांच्यासह माढा मतदार संघातील सर्वांची शिवरत्न बंगल्यावर बैठकही घेतली. एकूणच दबावतंत्राचा वापर मोहिते-पाटील यांनी केला पण हे त्यांचा फॉम्यूला फळाला आलेला दिसत नाही.

**रणजितदादांच्या निरोपाची प्रतीक्षा :** मोहिते-पाटील कुटुंबातील प्रमुख सदस्य आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील हे काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला गेले होते. या भेटीदरम्यान मोहिते-पाटील यांची नाराजी दूर करण्यात आली का, मोहिते-पाटील यांच्या पुनर्रवसनाचा फडणवीस यांनी काय शब्द दिला का? यासंबंधीचा तपशील मोहिते-पाटील समर्थकांना मिळालेला नाही. बंडाचे निशाण फकावित माढ्याची निवडणूक लढवायची की, भाजपा उमेदवाराचे काम करायचे? याबद्दल रणजितदादा यांच्याकडून कोणताचा निरोप मिळत नसल्याने कार्यकर्तेत तिष्ठत आहेत.

**सणांमुळे दौरे रद्द :** रविवारी होळी आणि सोमवारी धूलिवंदन या सणांमुळे दौरे रद्द केल्याची चर्चादेखील त्यांच्या समर्थकांमध्ये असली तरी खरे कारण वेगळेच असल्याचा देखील समर्थकांमध्ये दुसरा सूर आहे.

### ताई, जय श्रीराम! :

आपण केलेल्या स्वागताबद्दल मन:पूर्वक धन्यवाद! : गेल्या ५ वर्षात माळशिरस विधानसभा मतदार संघात विकासासाठी ज्या पद्धतीनं मेहनत केली आहे, त्याचं पद्धतीनं सोलापूर लोकसभा मतदार संघाच्या विकासासाठी कटिबद्ध राहीन. माझ्याही आपणांस खूप खूप शुभेच्छा !

मी २०१९ पासून सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदार संघाचं प्रतिनिधित्व करतोय. मी आमदार झाल्यापासून ते आजतोवर मी माझ्या मतदार संघातील जनतेच्या, आणि त्यायोगे सोलापूर जिल्ह्यातील जनतेच्या सेवेत माझ्यापरीनं प्रामाणिकपणे होईल तेवढी विकासकामे करण्याचा प्रयत्न केलाय्. मी ज्या भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे, तिथे आम्ही समाजालाही एकसंध ठेवण्यासाठी मा. नरेंद्र मोदींजीच्या नेतृत्वात ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास , सबका प्रयास’ या मंत्राला सार्थ ठरवत समाजातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी झटत आहोत. समाजात धर्म, जातीपातीत फूट पाडून कुणी एवढं वर्षे राजकारण केलंय. हे सोलापुढच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या जनतेनं चांगलंच ओळखलंय. राजकारणाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्या एका ऊस तोड कामगरांच्या कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर भारतीय जनता पार्टीनं जो विश्वास दाखवलाय, त्याला सोलापूरच्या सर्वांगीण विकास करून सार्थ ठरविण्यासाठी मी नक्कीच प्रयत्नशील राहीन. वंदे मारतम -

**आपला विनीत राम सातपुते**



# मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है!

# मै हूं कामवाला, राम मेरा नाम है!

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या कुशीत अन् मुशीत तयार होण्यासह स्वत:मधील गुणवैशिष्ट्यांच्या आधारे महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर स्वत:चं वेगळं निर्माण करण्यासह काँग्रेसच्या दिल्ली दरबारामधील श्रेष्ठींकडं स्वत:चं अस्तित्व निर्माण करणाऱ्या आमदार प्रणिती शिंदे हा राजकारणातील तरबेज चेहरा. सोलापूर हे आमदार प्रणितींचं होमपीच. या होमपीचवर प्रणितींचं तसं अगदी भारी लक्ष. या पीचच्या लोकसभेच्या आखाड्यात प्रणिती उतरल्यात. याच त्यांच्या हक्काच्या पीचवर आमदार राम सातपुते यांची भाजपाचे उमेदवार म्हणून लोकसभेच्या निवडणुकीसाठी एंट्री झाली आहे. या एंट्रीदरम्यान आमदार सातपुते यांचं स्वागत करताना आमदार प्रणिती शिंदे यांनी त्यांना धूळवडीचा जणू आहेर दिला आहे. उपरोधिक टोलेबाजीत प्रणिती यांनी त्यांच्या केलेल्या स्वागताची चर्चा तशी महाराष्ट्रात रंगतेय.**

भाजपकडून माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना काल उमेदवारी जाहीर झाली. त्यावर आमदार प्रणिती शिंदे यांनी ट्विट करून राम सातपुते यांचे सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात स्वागत केलं. प्रणिती शिंदे यांनी सोलापूर हे कायमच बहुभाषिक, बहुधार्मिक, सर्वधर्मसमभाव मानणारं शहर आणि जिल्हा असून इथं सर्वांना आपली मतं मांडण्याची मुभा मिळते. मग तो इथला असो किंवा बाहेरचा सोलापूरची लेक म्हणून मी तुमचं सोलापुरात स्वागत करते, अशा शब्दात प्रणिती शिंदे यांनी सातपुते यांना उपरोधिक टोला लगावला आहे. प्रणिती शिंदे यांच्या या ट्विटमुळे आता खऱ्या अर्थाने सोलापुरात राजकीय धुळवड सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान आगामी काळात राम सातपुते आणि प्रणिती शिंदे यांच्यामध्ये ‘ट्विटर वॉर’ होईल का याची चर्चाही रंगत आहे.

### सोलापूरची लेक म्हणून स्वागत...

उपरोधिक टोला, स्थानिक अन् उपराची जाणीव...

सोलापूर लोकसभेच्या आखाड्यात भाजपातर्फे लढण्यासाठी आलेल्या आमदार राम सातपुते यांचं आमदार प्रणिती शिंदे यांनी स्वागत करताना ‘सोलापूरची लेक म्हणून स्वागत करते’ असा मुद्दामहून खोचक उपरोधिक टोला त्यांनी मारला आहे. स्थानिक अन् उपरा याची जाणीव खास करून जाणीव प्रणिती शिंदे यांनी सातपुते यांना करून दिली आहे. सोलापूर लोकसभेच्या आखाड्यात स्थानिक अन् परका हा उमेदवारीचा विषय खूपच पेटलेला आहे. प्रचाराच्या उठलेल्या माहोलातदेखील हा मुद्दा प्रकर्षाने असणार आहे.



CMYK